सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र.बार्टी/योजना विभाग/CET/२०२५-२६/ ३१५ दिनांक :-१२/०१/२०२६

**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत सामयिक प्रवेश परीक्षांमधून संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, न्यायिक सेवा, अराजपत्रित गट “ब” व “क”, कर्मचारी निवड आयोग वर्ग ३ परीक्षा, पोलीस व मिलिटरी भरती प्रशिक्षण, बँक (IBPS), रेल्वे, एल. आय.सी व इतर तत्सम स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण संदर्भातील पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता निवड झालेल्या उमेदवारांसाठी प्रशिक्षण संस्था निवडीबाबतची विकल्प लिंक उपलब्ध करून देणेबाबत**

महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती आणि आर्टी या संस्थांच्या लाभार्थी गटांकरिता राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२५-२६ करिता विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता सर्वंकष धोरणांतर्गत सामयिक प्रवेश परीक्षांचे (CET) आयोजन बार्टी, पुणे मार्फत करण्यात आले. त्यानुसार बार्टी, पुणे मार्फत उमेदवारांना प्राप्त Percentile Score, आरक्षणानुसार तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी दिनांक १५/१२/२०२५ रोजी बार्टी, पुणे च्या अधिकृत संकेतस्थळावर वर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे मार्फत राबविल्या जाणा-या खाली नमूद केलेल्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीच्या तात्पुरती व प्रतीक्षा यादी मध्ये निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यासाठी विकल्प देण्याची सुविधा (Counseling Portal) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना:**

१. संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
३. महाराष्ट्र लोकसेवा आयोग- अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
४. महाराष्ट्र लोकसेवा आयोग- न्यायिक सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
५. महाराष्ट्र लोकसेवा आयोग- अराजपत्रित गट “ब” व "क" स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
६. बँक (IBPS), रेल्वे, एल. आय. सी व इतर तत्सम स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
७. पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण
८. कर्मचारी निवड आयोग वर्ग-३ परीक्षा पूर्व प्रशिक्षण

सदर स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याकरिता ऑनलाइन विकल्प देण्याची लिंक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर **दि.१२/०१/२०२६ रोजी पासून ते दि १९/०१/२०२६ रात्री ११:५९ वाजेपर्यंत** या कालावधीकरिता उपलब्ध राहील, सदर स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याकरिता ऑनलाईन विकल्प देण्याची लिंक उपरोक्त नमूद कालावधी पर्यंतच चालू राहील व त्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी

**जर एखादा उमेदवार एकाहून अधिक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी (UPSC, MPSC (State Service, MES, JMFC, Group B and C), IBPS, SSC- वर्ग ३ आणि पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण) पात्र ठरला असेल तर त्याने/ तिने आपल्या पसंतीनुसार केवळ एकाच योजनेची निवड करणे आवश्यक आहे.**

प्रशिक्षणाच्या माध्यमाबाबत (इंग्रजी/मराठी) उमेदवारांनी संबंधित पूर्व प्रशिक्षण देणाऱ्या नामनिर्देशित खाजगी संस्थेशी संपर्क करून त्याबाबत खात्री करून घेऊनच विकल्प भरावे. योजनेशी संबंधित नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांची माहिती View Details Tab मध्ये उपलब्ध असून त्याचा वापर संपर्काकरिता करावा. विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण संस्थांकडे सदर योजनांमध्ये अंतर्भूत नसणाऱ्या बाबी जसे की, रोख रकमेची मागणी करणे, टॅबलेट ची मागणी करणे, आर्थिक लाभाची मागणी करणे, प्रशिक्षण कालावधी मध्ये विविध सवलतीची मागणी करणे व तत्सम स्वरूपाच्या मागण्या करत असल्याचे आढळल्यास संबंधित उमेदवारावर योग्य ती कारवाई करून अशा उमेदवारांना अपात्र करण्यात येईल व विद्यावेतनाची पुनर्प्राप्ती/ वसुली करण्यात येईल तसेच आवश्यक असल्यास कायदेशीर कारवाई करण्याबाबतची प्रक्रिया करण्यात येईल याची उमेदवारांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

ज्या योजनेची निवड उमेदवाराने केली असेल ती अंतिम मानण्यात येऊन त्या योजनेशी संबंधित नामनिर्देशित खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध होईल. त्यानुसार नमूद असलेल्या संस्थांपैकी पसंतीच्या पाच संस्थाना उमेदवारांनी पसंतीक्रम/विकल्प (Preference) द्यायचा आहे.

पाच संस्थांना पसंतीक्रम/विकल्प दिल्यानंतर OTP द्वारे सदर पसंतीक्रम/विकल्प अंतिम केल्यानंतरच आपले पसंतीक्रम/विकल्प Submit करण्याचा Tab कार्यान्वित होईल. Submit वर click केले असता आपले पसंतीक्रम/विकल्प नोंद होऊन त्याची Acknowledgement Receipt (पोच पावती) तयार होईल.

सदर प्रमाणे प्राप्त झालेले पसंतीक्रम/विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही, सबब उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी योजनेची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी तसेच प्रशिक्षण संस्थांचे विकल्प हे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध माहिती View Details Tab मधून वाचून त्यानंतरच भरावे

प्रत्येक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत देय असलेल्या लाभाबाबतची सविस्तर माहिती (Stipend and any other payments as applicable) सदर घोषणापत्रकाद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. उमेदवारांनी सर्व माहिती पडताळून त्यानंतरच आपली योजना व प्रशिक्षण संस्था विकल्प देण्याची कार्यवाही पूर्ण करावी

प्रशिक्षण संस्थेच्या निवडीकरिता ऑनलाइन विकल्प देण्यासाठी संबंधित लिंक वरून लॉगीन करणे आवश्यक आहे. लॉगीन करताना उमेदवाराची कोणत्या वर्षासाठी ( सन २०२५-२६) निवड झालेली आहे ते वर्ष निवडावे लॉगीन करण्यासाठी उमेदवारांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या Email ID व Password यांचा वापर करावा. तसेच आपले लॉगीन आयडी व पासवर्ड हे संबंधित उमेदवारांना त्यांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या Email ID वर पुनःश्च पाठविण्यात येतील. सबब उमेदवारांनी सदर ईमेल व मोबाईल क्रमांक चालू स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

**ज्या योजनेची निवड उमेदवाराने केली असेल ती अंतिम मानण्यात येऊन** त्या योजनेशी संबंधित नामनिर्देशित खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध होईल. त्यानुसार नमूद असलेल्या संस्थापैकी पसंतीच्या पाच संस्थाना उमेदवारांनी पसंतीक्रम/विकल्प (Preference) द्यायचा आहे. पसंतीक्रम/विकल्प दिल्यानंतर OTP द्वारे सदर पसंतीक्रम/विकल्प सत्यापित (verify) केल्यानंतरच आपले पसंतीक्रम/विकल्प Submit करण्याचा Tab कार्यान्वित होईल. Submit वर click केले असता आपले पसंतीक्रम/विकल्प नोंद होऊन त्याची Acknowledgement Receipt (पोच पावती) तयार होईल. **OTP द्वारे जोपर्यंत आपण विकल्प सत्यापित (Verify) करत नाही तोपर्यंत आपले विकल्प अंतिम होणार नाहीत.**

सदर प्रमाणे प्राप्त झालेले पसंतीक्रम/विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही, सबब उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी योजनेची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी तसेच प्रशिक्षण संस्थांचे विकल्प हे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध माहिती View Details Tab मधून वाचून त्यानंतरच भरावे.

**सदर विकल्प लिंक वर Contact Us या Tab/शीर्षकाखाली सर्व संबंधित योजनांचे योजनानिहाय संपर्क Email ID दिले आहेत.** तसेच विकल्प लिंक वर लॉगीन केल्यानंतर Support या Tab/शीर्षकाखाली Raise A Ticket या सुविधेद्वारे आपली समस्या नोंदविण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी केवळ याच माध्यमातून आपल्या समस्या नोंदवाव्या. इतर कोणत्याही Email तसेच संपर्क क्रमांकावर आपल्या तक्रारी अथवा समस्येची नोंद घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. संबंधित खाजगी नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांमधील उपलब्ध प्रशिक्षणार्थी संख्येनुसार उमेदवारांना प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश दिला जाईल

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मा. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या दिनांक ११/०९/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार काठिण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने (वर्ग४<वर्ग३<वर्ग २<वर्ग १) घेण्यात येणाऱ्या पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांने पुर्वी तुलनेने कमी काठिण्य पातळी पुर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असला तरी संबंधित विद्यार्थ्यास चढत्या क्रमाने प्रशिक्षण कार्यक्रमाचा पुन:श्च केवळ एकदाच लाभ घेता येईल. अशाप्रकारे एक विद्यार्थी/उमेदवार स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत जास्त दोनदा लाभ घेण्यास पात्र राहील यानुसार उमेदवारांनी यापूर्वी दोन योजनांचा लाभ घेतला असल्यास सदर उमेदवार सन २०२५-२६ करिता अपात्र राहील. त्याअनुषंगाने **दोनपेक्षा जास्त योजनांचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल, याची सर्व विद्यार्थ्यांना नोंद घ्यावी.**

स्वाक्षरी..
(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे.**

# बार्टी, पुणे मार्फत सन २०२५-२६ करिता राबविण्यात येणाऱ्या योजनांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजना कालावधी | विद्यावेतन (प्रति माह), अनुषंगिक लाभ (पुस्तक संच रक्कम तसेच इतर खर्च-एकवेळ) |
|---|---|---|---|
| १ | यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - दिल्ली | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु. १३००० प्रती माह प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १८००० प्रती विद्यार्थी (एकवेळ)<br>• प्रवास खर्च -रु. १००००/- (एकवेळ) |
| २ | यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम- महाराष्ट्र | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु. १३००० महिने प्रती विद्यार्थी/ माह<br>• अनुषंगिक लाभ - रु. १८००० प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ३ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२०००/- प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ४ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग- अराजपत्रित गट"ब" व गट "क" सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन – रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ- रु.१२००० (एकवेळ) |
| ५ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग-महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन – रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ- रु.१२०००(एकवेळ) |
| ६ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग -दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) प्रशिक्षण कार्यक्रम | ११ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२००० प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ७ | बँक (IBPS), रेल्वे, एलआयसी, नाबार्ड इत्यादी तत्सम स्पर्धा परीक्षा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.६००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १००००/- प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ८ | पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ०६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२००० प्रती विद्यार्थी (एकवेळ) |
| ९ | कर्मचारी निवड आयोग (SSC) – वर्ग -३ परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ०६ महिने | • मोफत प्रशिक्षण<br>• विद्यावेतन - रु.१०००० प्रती महिने प्रती विद्यार्थी<br>• अनुषंगिक लाभ - रु. १२००० प्रती विद्यार्थी |